दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २७ वा बुधवार दि.२६ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# खबरदार शेतक-यांना सिबिल विचाराल तर : फडणवीस

मुंबई : शेतक-यांना सिबिलची अट लागू करू नये. तसेच सीबीलचे कारण दाखवून बँकांनी कर्ज नाकारले तर ते खपवून घेतले जाणार नसल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शेतक-यांना सिबिलची अट लागू करु नये. तसेच सिबिलचे कारण दाखवून त्यांना बँकांनी जर कर्ज नाकारले तर ते खपवून घेतले जाणार नसल्याचे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. सिबिलचे कारण सांगून बँकांनी कर्ज नाकारले तर त्यांच्यावर एफआयआर दाखल करु असा इशाराही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिला. एफआयआर दाखल केल्यावर आमच्याकडे येऊ नका असेही फडणवीस म्हणाले.

कोणत्याही बँकांना शेतक-याला कर्ज नाकारता येणार नसल्याचे फडणवीस म्हणाले. सिबिलचे कारण सांगून शेतक-यांना कर्ज नाकारु नये असेही ते म्हणाले. तसे जर झाले तर एफआयआर दाखल करण्याचा इशारा फडणवीसांनी दिला आहे. याबाबतची माहिती सर्व बँकांना द्यावी असेही ते म्हणाले. दरम्यान, शेतक-यांना कर्ज मिळताना येणा-या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला असल्याचेही फडणवीस म्हणाले. खरीप पूर्व बैठकीत बियाणे खतांची उपलब्धता याबाबतची चर्चा झाली आहे. शेतक-यांना पिक विमा मिळाला पाहिजे, याबाबातचा आढावा आजच्या बैठकीत आम्ही घेतला. खरीपाच्या हंगामात शेतक-यांना कोणताही त्रास होऊ नये याची काळजी घेतल्याचे फडणवीस म्हणाले. नॅनो खतांचा वापर वाढला पाहिजे डीपीए खतांचा वापर कमी झाला पाहिजे आणि नॅनो खतांचा वापर वाढला पाहिजे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. दरम्यान, जास्तीत जास्त शेतक-यांना पिक विमा मिळाला पाहिजे असेही फडणवीस म्हणाले. तसेच रासायनिक खतांचे लिंकिंग करणा-यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



पेरणीच्या कामांना वेग राज्यातील बहुतांश भागात चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे शेती कामांना वेग आला आहे. शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त असल्याचे पाहायला मिळत आहे. या खरीपाच्या पेरणीत शेतक-यांना बी बियाणे खते यांचा अपेक्षीत प्रमाणात पुरवठा व्हावा यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. दरम्यान, ज्या ठिकाणी चांगला झाला आहे, त्या ठिकाणी पेरणीच्या कामांना वेग आला. तर ज्या ठिकाणी चांगला पाऊस नाही, त्या ठिकाणचे शेतकरी चांगल्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या ३० जूनपर्यंत राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# पेपरफुटी प्रकरणात राजस्थान देशात अग्रस्थानी

नवी दिल्ली : पहिला नीटचा पेपर फुटला नंतर नेटचा पेपर फुटला आणि देशभरात विद्यार्थी वर्गांत पुन्हा एकदा असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. पेपर फुटण्याची किंवा कोणतीही परीक्षा वादात सापडण्याची ही पहिलीच घटना नाही, यापूर्वीही अनेक वेळा असे घडले आहे. त्यानंतर पेपर रद्द तरी झाले किंवा त्यावर समिती बसून तपास करण्यात आला. गेल्या ७ वर्षांमध्ये १५ राज्यांमध्ये पेपरफुटीचे ७० प्रकरणे समोर आली आहेत. यावेळी नीट परीक्षा २४ लाख मुलांनी दिली आणि पेपरफुटीचा त्यांना फटका बसला. या प्रकरणाचा तपास सुरू असून त्याची केसदेखील न्यायालयात सुरू आहे. राजस्थानमध्ये सर्वाधिक पेपरफुटीच्या घटना गेल्या काही वर्षांत राजस्थानमध्ये सर्वाधिक पेपर लीक झाले आहेत. राजस्थानमध्ये सात परीक्षांचे पेपर फुटले असून त्याद्वारे ४०,५९० पदे भरायची होती. त्यामुळे याचा फटका ३८ लाख ४१ हजार उमेदवारांना बसला. मध्य प्रदेश आणि तेलंगणा दुस-या क्रमांकावर

पेपर लीक प्रकरणात तेलंगणा आणि मध्य प्रदेश संयुक्तपणे राजस्थाननंतर दुस-या क्रमांकावर आहेत. या दोन्ही राज्यांमध्ये ५ पेपर लीक प्रकरणे नोंदवली गेली आहेत. तेलंगणामधी भरती परीक्षांद्वारे एकूण ३,७७० पदे भरायची होती आणि यामुळे ६,७४,००० उमेदवार अडचणीत आले होते. मध्य प्रदेशातही एकूण ५ प्रकरणे नोंदवली गेली ज्याद्वारे ३,६९० पदांवर भरती करायची होती. १,६४,००० उमेदवारांना या पेपरफुटीचा फटका बसला. उत्तराखंड तिस-या क्रमांकावर पेपर लीक प्रकरणात उत्तराखंड तिस-या क्रमांकावर आहे. १,८०० पदांच्या भरतीसाठी असलेले चार पेपर फुटले होते. या परीक्षेसाठी २,३७,००० उमेदवारांनी यासाठी अर्ज केले होते, त्यामुळे सर्वांना याचा फटका बसला.

गुजरात चौथ्या क्रमांकावर पेपर फुटीमध्ये गुजरात आणि बिहार ही दोन राज्ये चौथ्या क्रमांकावर आहेत. बिहार आणि गुजरात या दोन्ही राज्यांमध्ये पेपर लीकची एकूण तीन प्रकरणे समोर आली आहेत.

# ओवेसींनी दिली संसदेत 'जय फिलिस्तीन'ची घोषणा

नवी दिल्ली : हैदराबादचे खासदार आणि एआयएमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी १८ व्या लोकसभेच्या कामकाजाच्या दुस-या दिवशी अर्थात आज खासदार म्हणून शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर ओवेसी यांनी जय फिलिस्तीन (पॅलेस्टाईन), अशी घोषणा दिली. त्यांच्या या कृत्याने आता राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.



प्रोटेम स्पीकरने असदुद्दीन ओवेसी यांना लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेण्यासाठी बोलावले. ओवेसी आले आणि त्यांनी बिस्मिल्लाह म्हणत, खासदारकीची शपथ घेतली. खासदारपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी 'जय भीम, जय तेलंगणा आणि नंतर जय फिलिस्तीन (पॅलेस्टाईन)' अशी घोषणा दिली. यामुळे भाजप खासदारांनी संसदेत गदारोळ सुरू केला.

असदुद्दीन ओवेसी यांनी हैदराबाद लोकसभा सीटवरून सलग पाचव्यांदा निवडणूक जिंकली आहे. यावेळी त्यांना ६,६१,९८१ मते मिळाली आहेत. त्यांनी भाजपच्या माधवी लता यांचा ३,३८०८७ मतांनी पराभव केला. तत्पूर्वी, २०१९ च्या निवडणुकीत ओवेसी यांना एकूण ५८.९५% मते घेत विजय मिळवला होता. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी हैदराबाद मतदारसंघातून सर्वप्रथम २००४ मध्ये निवडणूक जिंकून संसदेत पोहोचले होते. यानंतर त्यांनी २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये सलग विजय मिळवला आहे.

# मुंबईत मराठी लोकांसाठी ५०% घरे आरक्षित ठेवा! : अनिल परब

मुंबई; : गुजराती लोकांकडून मराठी लोकांना घरे आणि नोकरी नाकारण्यात येत असतानाच आता मुंबईत नव्याने बांधण्यात येणार्या इमारतींमध्ये मराठी लोकांसाठी ५० टक्के घरे राखीव ठेवा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार अनिल परब यांनी सोमवारी केली. मराठी लोकांना नव्या इमारतींमध्ये घरे राखीव ठेवण्याबाबत परब यांनी अशासकीय विधेयक विधानमंडळ सचिवालयाकडे सादर केले असून ते मान्य करून विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती विधानमंडळ सचिवांना केली आहे. घरे राखीव ठेवण्याची जबाबदारी विकासकावर ठेवून तसे न केल्यास संबंधित विकासकाला सहा महिन्यांचा तुरुंगवास किंवा १० लाख रुपयांचा दंड किंवा दोन्ही शिक्षा ठोठावण्याची मागणी परब यांनी अशासकीय विधेयकाद्वारे केली आहे. घरे नाकारल्यामुळे मराठी लोकांचे मुंबईतून होणारे स्थलांतर रोखण्यासाठी या विधेयकाद्वारे मुंबईतील नवीन इमारतींमध्ये मराठी लोकांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी कायदा करण्याची मागणी परब यांनी केली आहे. मुंबईतील मराठी लोकांचा टक्का कमी होत आहे. मराठी माणसांना भाड्याने घरे मिळणेही मुश्कील झाले आहे, असे परब यांनी सांगितले.



# महाराष्ट्रातील ४८ पैकी ३६ खासदारांची मराठीतून शपथ

नवी दिल्ली (प्रतिनिधी) : लोकसभेच्या विशेष अधिवेशनात सभागृहाचा सदस्य म्हणून नवनिर्वाचित खासदारांना शपथ देण्यात आली. मागील २ दिवसांत महाराष्ट्रातील सर्व खासदारांनी संसदेत शपथ घेतली. यातील बहुसंख्य ३६ खासदारांनी मातृभाषा मराठीत शपथ घेतली तर काही खासदारांनी इंग्रजीतून ३ आणि हिंदीतून ९ जणांनी शपथ घेतली. काँग्रेस : शोभा बच्छाव, बळवंत वानखेडे, प्रतिभा धानोरकर,कल्याण काळे, वसंत चव्हाण, वर्षा गायकवाड, शिवाजी काळगे, छत्रपती शाहू महाराज, प्रणिती शदिं, गोवाल पाडवी (सर्व मराठी). शामकुमार बर्वे यांनी हिंदीतून तर प्रशांत पडोले, किरसान नामदेव यांनी इंग्रजीतून शपथ घेतली.भाजप : छत्रपती उदयनराजे भोसले, मुरलीधर मोहोळ, रक्षा खडसे, स्मिता वाघ, नारायण राणे, अनुप धोत्रे ( सर्व मराठी). पीयूष गोयल, नितीन गडकरी यांनी हिंदीतून तर हेमंत सावरा यांनी इंग्रजीतून शपथ घेतली. शिवसेना (ठाकरे गट) : संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, संजय जाधव, राजाभाऊ वाजे, संजय दिना पाटील, अनिल देसाई, अरविंद सावंत, भाऊसाहेब वाकचौरे,



ओमराजे निंबाळकर (सर्व मराठी) राष्ट्रवादी (शरद पवार) : अमर काळे, भास्कर भगरे,सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा), बजरंग सोनावणे, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते पाटील (सर्व मराठी) मात्र निलेश लंके यांनी इंग्रजीतून शपथ घेतली.शिवसेना (शिंदे गट) : प्रतापराव जाधव, संदीपान भुमरे, श्रीकांत शदिं, नरेश म्हस्के, रवींद्र वायकर, श्रीरंग बारणे, धैर्यशील माने (सर्व मराठी).राष्ट्रवादी (अजित पवार) : सुनील तटकरे यांनी मराठीतून आणि अपक्ष खासदार विशाल पाटील यांनी हिंदीतून शपथ घेतली.

# जि.प. माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने २ जुलै रोजी धरणे आंदोलन

लातूर/प्रतिनिधी: जि.प.प्रशालांतील राज्य आणि जिल्हा पातळीवरील समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी दि.२ जुलै रोजी राज्य संघटनेच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेसमोर एक दिवसाचे लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात रोहीणी नरे,तहसीलदार, जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरी आणि शिक्षणाधिकारी (प्रा) वंदना फुटाणे निवेदन देण्यात आले आहे.

जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांवर सतत होणारे अन्याय,राज्य आणि जिल्हा पातळीवर समस्यापूर्तीसाठी प्रशासनाची अनास्था याकडे लक्ष वेधण्यासाठी आणि जि.प.माध्यमिक समस्याग्रस्त शिक्षकांमधील असंतोष व्यक्त करून प्रलंबित समस्यांना न्याय मिळवून घेण्यासाठी जि.प. कार्यालयासमोर हे आंदोलन केले जाणार आहे.



जि.प. माध्यमिक शिक्षकांच्या वर्ग २ पदोन्नतीमध्ये अडसर ठरणारी शालेय शिक्षण विभागाने काढलेली अधिसूचना रद्द करून राज्यातील राजपत्रित मुख्याध्यापकांची ३५६ पदे आणि उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे सेवा जेष्ठ माध्यमिक शिक्षकांमधूनच भरावीत.संच मान्यतेचा शासन निर्णय त्वरित रद्द करावा आणि अभ्यास क्रमातील विशेष संख्या लक्षात घेऊन इयत्ता नववी व दहावी साठी किमान ४ शिक्षक आणि मुख्याध्यापकाचे पद मान्य करावे.माध्यमिक शिक्षकांच्या दहा वर्षापासून रखडलेल्या बदल्या होण्यासाठी ग्रामविकास विभागाने शुद्धिपत्रक काढावे. जि.प.माध्यमिक शिक्षकांना वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात यावी.१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती झालेल्या माध्यमिक शिक्षकांना जुनी पेन्शन लागू करावी. खाजगी शिक्षका प्रमाणे जि.प.शिक्षकांना १०:२०:३० लाभाची आश्वासित प्रगती योजना लागू करावी.माध्यमिक शिक्षकांना आरोग्य विषयक कॅशलेस योजना लागू करावी.माध्यमिक शिक्षक समायोजन प्रक्रियेसाठी स्वतंत्र शासन निर्णय काढून विज्ञान शिक्षकांवर अतिरिक्त दाखवून अन्याय केला जातो यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करावा. जिल्हास्तरावर आंतरजिल्हा बदली प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात त्यांना गती मिळावी.वरिष्ठ वेतनश्रेणी / निवड श्रेणी प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी कालमर्यादा आणि दिरंगाई साठी उत्तरदायित्व निश्चित करावे.माध्यमिक शिक्षकांना अर्जित रजा रोखीकरण मान्य करावे. प्राथमिक शिक्षकांना माध्यमिक शिक्षक पदावर पदोन्नती मिळाल्यास एक जादा वेतन वाढ ११/१ नियमानुसार मिळते. पदवीधर शिक्षकांनाही ही वेतनवाढ मिळावी. प्राथमिक शाळेवर केलेली माध्यमिक शिक्षकांची तात्पुरती प्रतिनियुक्ती रद्द करून हायस्कूलमध्ये रिक्त माध्यमिक पदी किंवा पदवीधर पदी नियुक्ती करावी.जि.प.प्रशाला दावणगाव आणि माळेगाव कल्याणी येथील अराजपत्रित मुख्याध्यापकाची रिक्त पदे त्वरित सेवाज्येष्ठ माध्यमिक शिक्षकांमधून पदोन्नतीने भरावीत.ही पदोन्नती समुपदेशन पद्धतीने करावी.

जि.प.माध्यमिक शिक्षकांचे समायोजन करताना शासन निर्णयातील अटीचे पालन करावे.अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रशालेतील रिक्त राजपत्रित मुख्याध्यापक पदावर करावे. चुकीच्या संच मान्यता जिल्हा पातळीवर दुरुस्त केल्या जाव्यात. १०० टक्के निकाल असणाऱ्या जि.प. शाळेतील शिक्षकांचा सत्कार करून त्यांना कार्यप्रवण करावे. प्रशालातील राजपत्रित मुख्याध्यापकाचा पदभार सांभाळणाऱ्या माध्यमिक शिक्षकांना नियमाप्रमाणे वेतनासोबत लहरळी रश्रश्रेुरपलश मिळावे. अत्युत्कृष्ट कार्य करणाऱ्या माध्यमिक शिक्षकांना ज्यादा वेतनवाढ द्यावी. रोखलेली वेतनवाढ सुरु करावी.आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण करावे . पुरस्कार प्राप्त शिक्षकाला एक जादा वेतनवाढ मिळावी.विदर्भाप्रमाणे मराठवाड्यातही घड्याळी तासिकेवर विषय शिक्षक नेमावेत.दिव्यांग माध्यमिक शिक्षकांची स्वतंत्र सेवाज्येष्ठता सूची तयार करुन ४ टक्के पदोन्नतीचा लाभ द्यावा. किमान तीन महिन्यातुन एकदा जिल्हा स्तरावर प्रशालेच्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांची बैठक आयोजित करावी. जि.प.हायस्कुलच्या ५० शाळांतील ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रमाणे मोफत पाठ्यपुस्तके,शालेय पोषण आहार,गणवेश व उपस्थिती भत्ता जि.प.शेष फंडातून द्यावा.माध्यमिक शिक्षकांना इड्ज सारखी अशैक्षणिक कामे देऊ नयेत.तालुक्यातील रिक्त गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार इच्छुक जि. प. हायस्कुलचा मुख्याध्यापक /सेवाज्येष्ठ माध्यमिक शिक्षकांना द्यावा.तालुक्या बाहेरील विस्तार अधिकाऱ्याला पदभार देऊ नये.निलंबित माध्यमिक शिक्षकांची प्रकरणे,निर्वाह भत्ता पुनर्स्थापना नियमांचे पालन करून करावा. कार्यालयातील दप्तर दिरंगाईस कारणीभूत चिरीमिरी देण्याचे प्रकार बंद व्हावेत.अतिरिक्त माध्यमिक शिक्षकांचे प्रशालेतील रिक्तपदावर तसेच राजपत्रित पदावर तात्पुरते का होईना समायोजन करावे.जागा नसल्यास स्व-जिल्ह्यातील नवोदय व निवासी शासकीय आश्रमशाळा यांचा विचार करावा. प्राथमिक शाळेत नेमणूक करुन माध्यमिक शिक्षक पदाचा अवमान करु नये. जि.प.प्रशालेतील ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनेचा लाभ त्या-त्या शैक्षणिक वर्षात द्यावा. थकीत सावित्रीबाई फुले आणि भारत सरकार मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्तीचे वाटप करावे. हायस्कूलमध्ये क्रीडांगण विकास योजनेतून ओपन जीम आणि खेळाचे मैदाने आखण्यासाठी निधी मंजूर करावा. ग्रापं/नपं/नपा/मनपा यांना वित्त आयोगातून विद्यार्थी हीत लक्षात घेऊन सुविधा पुरविणे बंधनकारक करावे. व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावे.हायस्कूल साठी उपलब्ध जमिनीची भुमि अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून दान पत्रानुसार नोंदी आणि हद्दी अद्ययावत कराव्यात. अतिक्रमण हटवावे आणि कंपाऊंड वॉल बांधावी. वनविभागाच्या चठएत्र्ख्ड योजनेतून शालेय परिसरात घनवन वृक्षारोपण करण्यास मंजूरी द्यावी. हायस्कूलमधील माध्यमिक शिक्षक, पर्यवेक्षक,कनिष्ठ सहाय्यक आणि परिचर यांची रिक्त पदे भरावीत.पात्र माध्यमिक शिक्षकांना निवड श्रेणी/ वरिष्ठ श्रेणी मान्य करावी.बंद पडलेली उदगीर (मुलांची) शाळा पुनर्जीवीत करावी.दुर्धर रोगाने पिडीत शिक्षक आणि कुटुंबातील व्यक्तींची मेडिकल बिले एक महिन्याच्या आत मंजूर करावी.कॅन्सर पीडित शिक्षकांना औषधोपचारासाठी सोयीच्या ठिकाणी पदस्थापना द्यावी,आदी मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष माधव गुंडरे यांच्यासह गणेश तुबाकले, किरण पाटील,महादेव शिंदे,प्रकाश जाधव, नंदकुमार कुलकर्णी, तेजस्विनी पंडित,सुधा हातोलकर,भगवान माळी, सुनिल बिराजदार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# सुरक्षित रेल्वे प्रवासाचे दिवास्वप्न

पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात कांचनजंगा एक्स्प्रेसला मालगाडीने मागून धडक दिल्याने झालेले नुकसान हेच दर्शवते की, गेल्या वर्षी ओडिशातील कोरोमंडल एक्स्प्रेसच्या भीषण अपघातातून आपण कोणताही धडा घेतलेला नाही. कांचनजंगा एक्स्प्रेस दुर्घटनेतील मृतांची संख्या अकरा असल्याचे सांगण्यात येत असून चाळीसहून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. कोरोमंडल एक्स्प्रेसच्या धडकेत २९० हून अधिक लोकांना जीव गमवावा लागला होता. हा रेल्वे इतिहासातील सर्वात मोठा अपघात होता.

टक्करविरोधी तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह कांचनजंगा रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये मालगाडीचा चालक आणि सहचालकाही समावेश आहे. अपघाताचे खरे कारण तपासानंतरच कळणार असले, तरी अपघाताच्या तीन तास आधी राणीपत्र रेल्वे स्थानक ते छत्तर हाट जंक्शनदरम्यानची स्वयंचलित सिग्नलिंग यंत्रणा बिघडल्याचे सांगण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. अपघाताचे कारण शोधून जबाबदारी निश्चित करण्याचीही चर्चा आहे. बालासोर दुर्घटनेपासून धडा घेऊन रेल्वे अपघात रोखण्यासाठी प्रभावी पावले उचलली जातील, अशी आशा यापूर्वी व्यक्त केली जात होती; पण जमिनीस्तरावर परिस्थिती बदलताना दिसत नाही. रेल्वे यंत्रणेच्या निष्काळजीपणाचे उदाहरण यावर्षी फेब्रुवारीमध्ये दिसून आले होते. कठुआ ते दसुआ (पंजाब) दरम्यान सुमारे ७० किलोमीटर अंतरापर्यंत चालकाविना मालगाडी धावताना दिसून आली. सुदैवाने या ट्रॅकवर एकही गाडी न आल्याने अपघात टळला. कांचनजंगा एक्स्प्रेस दुर्घटनेनंतर राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. सत्ताधारी आणि विरोधक कोणाच्या कारकिर्दीत अधिक रेल्वे अपघात झाले, याचे तपशील देत आहेत. रेल्वे अपघात रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या टक्करविरोधी तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

गजबजलेल्या ईशान्येकडील मार्गावर त्याची अंमलबजावणी झाली असती, तर कदाचित ही दुर्घटना टाळता आली असती. मानवी चुकांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी रेल्वे मंत्रालय गांभीर्याने पुढाकार का घेत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. रेल्वे अपघात रोखणे हा सत्तेत असलेल्यांच्या प्राधान्यक्रमात का नाही? रेल्वे टक्कर टाळण्याची यंत्रणा 'कवच', जी टप्प्याटप्प्याने त्वरित कार्यान्वित व्हायला हवी होती; पण हे काम गोगलगायीच्या गतीने का सुरू आहे? एकीकडे देशात बुलेट ट्रेन आणि इतर हायस्पीड ट्रेनची चर्चा होत आहे. लोकसभा निवडणुकांदरम्यान पंतप्रधान मोदींनी येणार्‍या पाच वर्षांत देशाला पहिली बुलेट ट्रेन मिळेल, असे आश्वासन पुण्यातील सभेत दिले होते; पण मग सामान्य वेगाने धावणार्‍या ट्रेनलाही अपघातांपासून सुरक्षित करण्यात आपण अपयशी का ठरत आहोत? देशातील रेल्वेगाड्यांचा वेग वाढवून त्या चकचकीत आणि आलिशान करताना सामान्य वेगाच्या गाड्यांचा प्रवास सुरक्षित कसा होईल, याकडे लक्ष देण्यात कुचराई का केली जात आहे? वाढत्या लोकसंख्येच्या दबावाखाली रेल्वे सुरक्षित रेल्वे सेवा देऊ शकत नाही, हेही वास्तव आहे.

रेल्वे वाहतूक अपघातांपासून सुरक्षित करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि अधिक गुंतवणुकीची गरज आहे. भूतकाळातील अपघातांमधून धडा घेऊन कार्यप्रणाली सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अपघातांची जबाबदारी निश्चित केली गेली पाहिजे, जेणेकरून अपघातांची पुनरावृत्ती रोखता येईल. अपघात टाळण्यासाठी 'कवच' योजना लवकरात लवकर उच्च दाबाच्या भागात राबविणे ही काळाची गरज आहे. याशिवाय ट्रॅक्सच्या देखभालीसाठी देण्यात आलेल्या निधीचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची, अपघात टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आणि नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी रेल्वे कर्मचार्‍यांना प्रशिक्षण देण्याचीही गरज आहे. तसेच रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी आर्थिक संसाधनांची जमवाजमव करावी लागणार आहे. एकंदरीत प्रवाशांच्या सुरक्षेला रेल्वे मंत्रालय आणि सरकारचे प्राधान्य असेल तेव्हाच अपघातांची मालिका थांबेल.

# स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माते!

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणार्‍या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई- आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकर्‍या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेर्‍या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.


सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषत: प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. !! सामाजिक न्याय दिन व पावन जयंतीनिमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

***********

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार.
(भारताच्या वैभवशाली इतिहास-अस्मितेचे गाढे अभ्यासक.)
मु. रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.
जि. गडचिरोली, मोबा. ७७७५०४१०८६.

# आरक्षण मागणारे मराठे आणि राजर्षी शाहूमहाराज.



मनोज जरांगे पाटील यांनी राज्यात गेल्या काही महिन्यात वर्षात मराठ्यांना आरक्षण पाहिजे म्हणजे पाहिजे. हीच भूमिका घेऊन राज्यात प्रचंड राजकीय दहशत निर्माण केली.त्याला सर्वच राजकीय पक्ष टरकून वागत होते. लोकसभा निवडणुकीत आरक्षण मांगणारे मराठे ,शेतकरी मराठे,बेरोजगार तरुण मराठे,नोकरी न मिळालेले मराठे. प्रस्थापिक राजकीय पक्षा धडा शिकवतीन अशी अपेक्षा होती. पण त्यांचा प्रभाव कुठे ही फारसा जाणवला नाही. कारण आरक्षण मांगणार्‍या मराठ्यांना आरक्षणाचे जनक राजर्षी शाहूमहाराज माहितीच नाही.

महाराष्ट्र राज्यात विशेष मराठा समाजात आज ही राजर्षी शाहूमहाराज यांचे महत्व पाहिजे त्या प्रमाणात नाही.मराठा सेवा संघ आणि त्याच्या ३२ कक्षा गेल्या ३० वर्षात छत्रपती शिवाजी महाराज,शाहूमहाराज समजावून सांगत आहेत.पण त्यातून आवश्यक ते प्रबोधन झाले नाही. असे खेदाने लिहावे लागते.आज २६ जून राजर्षी शाहू महाराज यांची जयंती.फुले-शाहू-आंबेडकर हे आधुनिक महाराष्ट्राचे, पुरोगामी महाराष्ट्राचे प्रेरणास्त्रोत आहेत. परंतु महाराष्ट्राच्या एकूण समाजकारणावर जातवास्तवाचा मोठा प्रभाव असल्यामुळे महापुरुषांचा नामोल्लेख करताना ही अनेकांची अडचण होताना दिसते. महाराष्ट्रातील पुरोगामी विचारवंत काही वर्षापूर्वी 'फुले-आंबेडकरांचा'महाराष्ट्र असा उल्लेख करायचे. हीच मंडळी कोल्हापुरात आल्यावर त्यात शाहूंचे नाव समाविष्ट करत. म्हणजे कोल्हापूरच्या बाहेर शाहूंना फुले-आंबेडकरांच्या बरोबरीने स्थान दिले जात नव्हते. राज्यकर्त्यांचेही यापेक्षा वेगळे काही नव्हते. परंतु कांशीराम-मायावती यांनी उत्तरप्रदेशातील सत्तेत असताना फुले-आंबेडकरांच्या बरोबरीने राजर्षी शाहूंना स्थान दिल्यामुळे, विशेष मराठा समाजातील सत्ता धारयांच्या गोटात उलटा पालट झाली. यानंतर महाराष्ट्राच्या पातळीवरही शाहूंचे नाव घ्यायला सुरुवात झाली आणि आज ते रूढ झाले. हे सगळे पुन्हा जाती-पातीच्या समाजकारणाशीच संबंधित आहे. महात्मा फुले यांना माळी समाजाने मना पासुन कधीच दैवत मानले नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्व दलितांनी आपले दैवत बनविले पण किती मानले हा प्रश्न आहेच?. राजर्षी शाहू महाराज यांना स्वीकारणे मराठा समाजासाठी तेवढे सोपे नव्हते. आजही नाही. आजही मराठय़ांना शाहू महाराज अडचणीचेच वाटतात. देशात आरक्षण ही संकल्पनाच राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केली,कारण मराठा समाज हा देणारा होता. आपल्या संस्थानात मागासवर्गीय आणि आर्थिक दुर्बलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय १९०२ मध्ये त्यांनी घेतला होता. वेगवेगळ्या नावांनी काम करणार्‍या मराठा संघटना आज शिवाजी महाराज,जिजाऊ यांची नावे घेतात, परंतु शाहू महाराज अनेकांना अडचणीचे वाटतात. कारण शाहू महाराजांना स्वीकारले, तर आरक्षणाचे समर्थन करावे लागते. आणि आरक्षणाचे समर्थन करून मराठय़ांचे संघटन करता येत नाही.म्हणून मराठा सेवा संघ आणि त्याचे ३२ कक्ष मराठा समाजाला राजर्षी शाहु महाराज जास्त सांगताना दिसत नाही.

सामाजिक बंधुभाव, समता, दलित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला व क्रिडा, आरोग्य आदी क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी ज्यांनी शर्थीचे प्रयत्न केले, ते आधुनिक भारताचे भाग्यविधाते, आरक्षणाचे जनक यशवंत जयसिंगराव घाटगे म्हणजेच छत्रपती शाहू महाराज, पारतंत्र्य, दुष्ट रूढी परंपरा, निरक्षरता, अज्ञान इत्यादी समस्यांनी ग्रासलेल्या काळात २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर येथे त्यांचा जन्म झाला. शाहू महाराज नावाप्रमाणेच यशवंत राहिले. भारतमातेच्या पोटी अनेक थोरांनी, संता, महंता, राजे, महाराजे, समाज सुधारकांनी जन्म घेऊन भारतातील गोरगरीब दीन दुबळ्यांची मनोभावे सेवा केलेली आहे.पण राजर्षी शाहु महाराजा त्यांच्या पेक्षा काकन भर सरस आहेत.

बहुजन हिताय बहुजन सुखाय हे सूत्र ध्यानात घूऊन शाहू महाराज राज्यकारभार पाहू लागले. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय याची फळे सर्व समाजाला चाखता यावीत म्हणून त्यांनी आपले सिंहासनच पणाला लावले. अज्ञान अंधश्रद्धा, निरक्षरता सामाजिक दुजाभाव, दारिद्र्य यात गुरफटलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी महाराजांनी आपला खजिना सताड उघड ठेवला.छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक बंधूभाव, समता, दलित, बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य इ. क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी त्यांनी खूप परीश्रम घेतले. समाजातील गोरगरीब, दीनदुबळे, मागासवर्गीय, उपेक्षित व आर्थिकदृष्टय़ा दुर्बल घटकांच्या सर्वागीण विकासाला प्राधान्य देणारे ते एकमेव राजे होते. सुरूवातीस कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा कायदा लागू केला. समता प्रस्थापित करण्याच्या ध्येयाने अस्पृश्यता निवारणाकरिता जातीभेद निर्मूलन, बलुतेदारी पद्धतीवर बंदी आणली. स्त्री शिक्षण, देवदासी प्रथेचे उच्चाटन, महिला संरक्षण कायदा, विधवा पूनर्विर्वाह कायदा, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन यासारख्या परीवर्तनवादी मुद्दे प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे धाडस त्यांनी केले व त्यांची अंमलबजावणी होते की नाही ते स्वत: खात्री करून घेत असत. स्त्री हक्क स्वातंत्र्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन पत्नीला त्रास देणार्‍या पतीसाठी शिक्षेच्या कायद्याची तरतूद केली. अनिष्ठ रुढी परंपरा उच्चाटनासाठी प्रयत्न केले. १९१७ मध्ये विधवा पूनर्विवाह कायदा व विवाहनोंदणी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. शंभर वर्षापूवी शाहूराजांनी ज्या दूरदृष्टिने निर्णय घेतले, त्याच्या जवळपासही आजचे राज्यकर्ते जाऊ शकत नाहीत. मानवी जीवनाच्या विकासाचे असे एकही क्षेत्र नाही, ज्यासाठी महाराजांनी काम केले नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नेते असल्याचे त्यांनीच माणगावच्या परिषदेत जाहीर केले. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. राधानगरी धरण बांधून सिंचनाची सोय केली. कुस्तीला प्रोत्साहन दिले. कोल्हापुरात प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतिकारक कार्य केले. फासेपारध्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी राबवलेली बांधकाम योजना राज्यकर्त्यांना नेहमीच मार्गदर्शक ठरणारी आहे. हे सगळे करीत असताना समाजातील विशिष्ट वर्गाशी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. संघर्ष करतानाही त्यांनी विकासाची वाट आणि तळागाळातील घटकांप्रती असलेली बांधिलकी याचा कधी विसर पडू दिला नाही. प्रस्थापितांनी त्यांच्या बदनामीच्या कहाण्या रचल्या. परंतु नव्या पिढीतल्या इतिहास संशोधकांनी त्या कहाण्या म्हणजे हितसंबंध दुखावलेल्या मंडळींनी रचलेली कुभांडे असल्याचे सिद्ध केले आहे.

बहुजन व मागासवर्गीय समाजातील मुला-मुलींना परिपूर्ण शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांचा बौद्धिक, सामाजिक व आर्थिक विकास शक्य नाही हे महाराजांनी हेरले व ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावाला शाळांची निर्मिती केली व शिक्षण सक्तीचे केले, एवढे करून न थांबता त्यावरील शुल्क माफ केले. जे पालक आपल्या पाल्यांना रोज शाळेत पाठविणार नाही अशा पालकांना प्रतिमहिना एक रुपया दंड आकारण्याची कायदेशीर तरतुदही केली. तसेच त्यांनी वसतीगृहे उभे केलीत, गरिब विद्यार्थ्यांसाठी तर त्यांनी आपला राजवाडाच खुला केला. यामुळे बहुजन व दलित समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना शिक्षणाचे दरवाजे खुले झालेत.८ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा जाहिरनामा काढला. २१ मे १९१९ रोजी आर्थिक दृष्टय़ा दुर्बल विद्यार्थ्यांना फी माफीचा निर्णय घेतला. १ जानेवारी १९१९ रोजी आज्ञा देवून प्राथमिक शाळा व महाविद्यालयातील अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांसारखीच समानतेची वागणूक द्यावी म्हणून शिक्षण खात्याला आदेश दिला. ३० सप्टेंबर १९१९ रोजी अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा बंद केल्यात. ६ जुलै १९०२ मागास जातींना नोकरीत ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची घोषणा केली. २३ पेब्रुवारी १९१८ ला कुलकर्णी वतने बंद, तलाठी सुरू. आंतरजातीय विवाह कायदा १५ एप्रिल १९२० नाशिक येथे उदोजी मराठा विद्यार्थी वसतीगृहाचा कोनशिला समारंभ केला. १९ नोव्हेंबर १९२१ मध्ये रायगड येथे शिवस्मारकाचा पायाभरणी समारंभ प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते झाला. तसेच सिंधूदुर्ग जिल्ह्य़ातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचा जिर्णोद्धार ही केला. १६ फेब्रुवारी १९२२ दिल्लीत भरलेल्या अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे ते अध्यक्ष होते.आजच्या बहुसंख्य मराठा समाजाला हा इतिहास माहित नाही.आमच्या सारख्या आंबेडकरी चळवळी तील लोकांनी सांगितला तर तो त्यांना पचत नाही.

आदरणीय पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघाच्या मराठा मार्ग मध्ये लिहले होते की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मराठा समाजाचे राजर्षी शाहु महाराज यांनी शिक्षणा साठी खुप मोठी मदत केली. म्हणून बाबासाहेब भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले.हे आंबेडकरी चळवळीच्या लोकांनी विसरु नये. त्याकरिता आंबेडकरी चळवळीतील जाणकार बुद्धिजीवी लोकांनी अज्ञानी अंधश्रद्धा मध्ये गुंतलेल्या मराठा समाजाच्या घरी जाऊन समाज प्रबोधन करावे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे आम्हाला शाहु महाराज,सयाजी महाराज, कबीर, महात्मा ज्योतिराव फुले आणि तथागत बुद्ध कळाले.आम्ही ते अभ्यासले म्हणुन आमच्या सारखे लोक नेहमी मराठा समाजा बरोबर मंगल मैत्री करण्याचा प्रयत्न करतो.पण त्याचा अर्थ खेड्या पाड्यातील मराठा समाजातील लोक महार माजले त्यांना जास्त माज आला असा काढतात.मनोज जरांगे पाटील यांनी राज्यात गेल्या काही महिन्यात वर्षात मराठ्यांना आरक्षण पाहिजे म्हणजे पाहिजे. यासाठी कोणते क्रांतिकारी विचारांचे प्रबोधन केले. यावर भाष्य लिहणारे फारसे कोणी दिसत नाही.लोकसभा निवडणुकीत आरक्षण मांगणारे मराठे,शेतकरी मराठे,बेरोजगार तरुण मराठे,नोकरी न मिळालेले मराठे. प्रस्थापिक राजकीय पक्षा धडा शिकवतीन अशी अपेक्षा होती.पण त्यांचा प्रभाव कुठे ही फारसा जाणवला नाही.कारण आरक्षण मांगणार्‍या मराठ्यांना आरक्षणाचे जनक राजर्षी शाहूमहाराज माहितीच नाही. म्हणूनच राजर्षी शाहु महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्य सर्व मराठा समाजाला नम्र आवहान आहे की प्रथम शाहु महाराज समजून घ्या त्यानंतर आपले खरे शत्रु कोण व खरे मित्र कोण हे समजून येईल.हीच राजर्षी शाहु महाराज जयंती निमित्य सर्व बहुजन समाजाला विशेष मराठा समाजा ला विनंती.राजर्षी शाहूमहाराज,जन्म जून २६,जून १८७४ यांच्या १५० व्या जयंती निमित्या त्यांच्या क्रांतिकारी विचारांना व प्रतिमेला विनम्र अभिवादन आणि जयंती निमित्य सर्व बहुजन मराठी समाजाला हार्दिक शुभेच्छा!!!



*****

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

# लोककल्याणकारी राज्यकर्ते – राजर्षी शाहू महाराज

ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना राजर्षी ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. राजघराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी वैदिक स्तोत्रानुसार ब्राह्मणेतरांचे संस्कार करण्यास नकार दिल्याने शाहूंनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा देण्याबरोबरच मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला. त्यांनी पुजाऱ्यांना हटवून क्षात्रजगद्गुरू (क्षत्रियांचे विश्व गुरू) ही पदवी देऊन एका तरुण मराठाची ब्राह्मणेतरांचे धर्मगुरू म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले. याला वेदोक्त वाद म्हणून ओळखले जाते. ते लवकरच ब्राह्मणेतर चळवळीचे नेते बनले आणि मराठ्यांना त्यांच्या झेंड्याखाली एकत्र केले



राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ मध्ये संस्थानचा राज्यकारभार स्वीकारला. राज्यभर फिरून लोकांची परिस्थिती, गरजा व त्यांची दुःखे जाणून घेतली. सामान्य जनतेच्या भावना ओळखून त्यांचे दुःख निवारण करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. अज्ञान, अंधश्रद्धा नि अस्पृश्यता या तीन व्याधी निपटून काढल्याखेरीज आपल्या प्रजेच्या विकासाच्या वाटा खुल्या होणार नाहीत, याची खूणगाठ बांधून महाराजांनी कामाला सुरुवात केली. गावोगावी शाळा काढल्या, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले, पुरोहित शाळा सुरू केल्या. त्याकाळी अस्पृश्यांना विद्येचा अधिकार तर नव्हताच; पण देवालये, चावड्या, सार्वजनिक पाणवठे आदी ठिकाणीही प्रवेश करण्यास त्यांना मनाई होती. महाराजांनी अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न स्वतःपासून केला. अस्पृश्य तरुणांना मोटार ड्रायव्हिंगच्या कोर्सला पाठवून आपल्या, महाराणी साहेबांच्या, चिरंजीव आक्कासाहेब व युवराज यांच्या गाडीवर नेमले. पट्टेवाले, शिपाई, डगलेवाले पोलीस, स्वतःचे शरीर–रक्षक अस्पृश्य नेमले. थोडेसे शिक्षण झालेल्यांना त्या मानाने कारकून, रजिस्ट्रारच्या जागा दिल्या. महात्मा फुले यांचा अस्पृश्योद्धाराचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरविला. खुद्द महाराजांच्या राजवाड्यातही ही सुधारणा अप्रिय वाटत होती. आपल्या राजवाड्यातील खासगी देवालयातील ब्राह्मण पुजाऱ्यास महाराजांनी काढून टाकले. पूजा–अर्चा, धार्मिक विधी प्रत्येक ठिकाणी मराठा पुरोहितांकडून चालू केले. राजवाड्यातही सर्वांना मराठा पुरोहितांकडून विधी करवून घ्यावेत, अशी सूचना केली. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते.शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. राजर्षी शाहूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे.

अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली.

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करून समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले. दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होते. बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये दलितांचा नेता व भारतीय अग्रणी नेता म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असे आवाहनही महाराजांनी केले. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले.

कुशाग्र बुध्दिमत्ता, प्रभावित करणारं व्यक्तिमत्व, कलेविषयी अगाध प्रेम, थोर समाज सुधारक, बहुजन समाजाचा उध्दारकर्ता, कुशल प्रशासक, स्वच्छ प्रतिमा असलेला राज्यकर्ता म्हणुन कोल्हापूर संस्थानांचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांनी दैदिप्यमान राज्य कारभार केला. ज्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कर्तृत्वाची नोंद घेवूनच देशभर त्यांची १५० वी जयंती साजरी होत आहे, त्या निमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

********

प्रविण बागडे नागपूर
भ्रमणध्वनी :
९९२३६२०९१९

# आतड्यांमधील जमलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ५ पदार्थ? सेवनाची 'ही' पद्धत जाणून घ्या

लहान आतडे आणि मोठे आतडे हे आपल्या शरीराच्या पचनसंस्थेतील महत्त्वाचे अवयव आहेत. कारण– ते पचनसंस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. आपल्या अन्नातून निरोगी आणि पौष्टिक गोष्टींचे पचन करणे हे आतड्यांचे कार्य असते; पण शरीरातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्याचे कामही ते करतात. त्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुदृढ राखणे निरोगी शरीरासाठी गरजेचे आहे. जर आतड्यांचे आरोग्य चांगले असेल, तर आपली रोगप्रतिकार शक्ती उत्तम राहते; पण अनेकदा आपण आतड्यांच्या आरोग्याकडे लक्ष देत नाही आणि आरोग्याच्या समस्या स्वत:हून अंगावर ओढवून घेतो. आतड्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आता काय खावे, काय खाऊ नये याबाबत अनेक जण सजग आहेत. या पार्श्वभूमीवर आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आपण कसे जेवावे हे माहीत असणेही गरजेचे आहे. सध्या आतड्यांसंबंधीच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. आजच्या घडीला ही वाढ मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. कारण– बहुतांशी लोक घराबाहेरील अन्न



अधिक प्रमाणात खाताना दिसून येतात आणि असे अन्न शरीरासाठी अत्यंत अपायकारक आणि घातकसुद्धा ठरत आहे. त्यामुळे आतड्यांचे आरोग्य वेगाने धोक्यात येत असल्याचे दिसून येते. त्याचसोबत मद्यपान आणि धूम्रपान यांमुळेही अशाच समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे चांगला आहार घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कोणते पदार्थ तुमच्या आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते, या विषयावर नवी दिल्ली येथील पोषणतज्ज्ञ कनिका नारंग यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. आपण ती माहिती सविस्तर जाणून घेऊ. निरोगी आतडे योग्य पचनाशी संबंधित आहे. जेव्हा आपली आतडी निरोगी असतात तेव्हा वजन नियंत्रणात राखणे खूप चांगल्या प्रकारे शक्य होते. एकंदरीत आतड्यांचे आरोग्य चांगले राखणे अत्यंत गरजेचे आहे. तुमच्या रोजच्या आहारात काही आरोग्यदायी बदल करून हे शक्य होऊ शकते. १. दही दही एक प्रो–बायोटिक आहार आहे; ज्यामध्ये आतड्यांसाठी अनुकूल जीवाणू असतात. दही आतड्यांतील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढविण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते. त्याचबरोबर अनारोग्यास कारणीभूत ठरणारे प्रतिकूल जीवाणू काढून टाकण्यासाठीही दही उत्तम स्रोत आहे.

२. कच्ची केळी कच्ची केळी खाल्ल्याने आरोग्यदायी आंत मायक्रोबायोम वाढण्यास मदत होते. ते प्रतिरोधक स्टार्चने समृद्ध असतात आणि रक्तातील साखरेचे नियमन करू शकण्यासह इन्सुलिन संवेदनशीलता सुधारू शकतात.

३. अळशी विरघळणारे फायबर आणि ओमेगा –३ फॅटी ॲसिडस् यांनी समृद्ध असलेली आळशी आतड्यांची जळजळ कमी करते आणि हृदयाच्या आरोग्यास समर्थन देते. दररोज आपल्या आहारात एक–दोन चमचे अळशीचा समावेश करा.

४. ॲव्होकॅडो विरघळणाऱ्या फायबरव्यतिरिक्त यात निरोगी चरबी असते. त्यामुळे पोषक शोषण क्षमता सुधारते आणि निरोगी आतड्यांतील मायक्रोबायोमला समर्थन देते. दिवसाकाठी अर्धा ॲव्होकॅडो चांगला आहे. ५. ग्लुटेनमुक्त ओट्स ग्लुटेनमुक्त ओट्स हा विरघळणाऱ्या फायबरचा चांगला स्रोत आहे आणि त्यामुळे आतड्यांच्या आरोग्यास मदत मिळते. तसेच त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होऊन, हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन लाभते. दररोज ३० ग्रॅम (एक वाटी) शिजविलेले ग्लुटेनमुक्त ओट्स सेवन करण्याचे लक्ष्य ठेवा.

# लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिवस प्रत्येक व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर


प्रथमतः मी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त आपण सर्वांना कोटी कोटी सदिच्छा! व्यक्त करतो. या निमित्ताने त्यांचा संदेश आपल्यापर्यंत पोहचवण्यासाठी या लेखाच्या माध्यमातून अभिवादन करतो राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक भान असलेले कृतीशील लोकराजे होते. त्यांचा जन्म २६ जून १८७४ ला झाला होता. त्यांनी आपल्या संस्थानात राबविलेल्या लोककल्याणकारी उपाययोजनांची आजही तेवढीच नितांत आवश्यकता आहे. समतामय निकोप समाज निर्माण करण्यासाठी सर्व हितचिंतकांनी आपली भूमिका पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे. महार वतन रद्द करण्याच्या हेतूने शाहू महाराजांनी घेतलेल्या भूमिकेवर बोलताना गळा कापला व खोकला हटला. अशी महार वतन खालसा समितीचे उपदेशक बळवंत नारायण शिंगे यांनी आपली प्रतिक्रिया प्रशासनाला कळविली होती. अस्पृश्य लोकांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून त्यांच्यासाठी शाहू महाराजांनी वस्तीगृहे काढलीत, शिक्षणासाठी विद्या मंदीरे खुले केलीत, कित्येकांना नोक–या दिल्यात एवढेच नव्हे! तर पन्नास टक्के आरक्षणाचे आदेश काढून अंमलबजावणी करण्याची सुरुवात केली. काहींना वकिली सारख्या व्यवसायात स्थिरावता यावे म्हणून सहकार्य केले. गंगाराम कांबळे सारख्या अस्पृश्य व्यक्तिला चहाचे हॉटेल चालविण्यासाठी अर्थ सहाय्य केले, एवढेच नव्हे! तर ते हॉटेल चालावे म्हणून ते स्वतः चहा पिण्यासाठी समूहासह तिथे जात असत. अशाप्रकारे स्पृश्यास्पृश्यतेचा भेद बाजूला ठेवून त्यांच्या संस्थानात समतामुलक समाज निर्माण करण्याचा त्यांनी कृतीशील प्रयत्न केला आहे.

जानेवारी १९२० रोजी मुंबईच्या भायखळा येथील पिवळी माडी येथे नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत वर्गाची सभा संपन्न झाली होती. ज्यात प्रामुख्याने दोन ठराव घेण्यात आले होते. पहिला म्हणजे कायदे कौन्सिलात बहिष्कृत वर्गाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावेत. आणि त्यांची निवड ही त्यांच्याच संघामार्फत व्हायला हवी. तसेच दुसऱ्या क्रमांकाचे ठरावात शाहू छत्रपती कोल्हापूर यांनी बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीसाठी चालविलेल्या प्रयत्नाबद्दल त्यांचे आभार मानण्याचे ठरविण्यात आले होते.

ा पार्श्वभूमीवर दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद म्हणजे कागल संस्थानातील माणगांव परिषद होय, जी २१ व २२ मार्च १९२० ला संपन्न झाली. या परिषदेला लोकांनी उपस्थित राहू नये म्हणून तलाठी, कुलकर्णी यांसारख्या उच्च वर्णियांनी इतरांची मने कलुषित करण्यासाठी विष पेरण्याचे काम केले होते. तरीही सुधारणावादी ब्राह्मणासह कोल्हापूर दरबारातील वरिष्ठ दर्जाची व बहिष्कृतांचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र या परिषदेला बहिष्कृत वर्गासाठी काम करणाऱ्या संघटना व डिप्रेस्ड क्लास मिशनचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते! हे उल्लेखनीय होय.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी स्वागताध्यक्ष दादासाहेब राजेसाहेब इनामदार म्हणाले की, हल्लीच्या स्वराज्याच्या काळात इतर लोक आपले बरे करतील असे समजून त्यांच्यावर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या स्वजनोद्धाराचे महत्कार्य आपण स्वतःच केले पाहिजे.

पुढे या परिषदेत बोलताना अध्यक्ष भीमराव आंबेडकर म्हणाले की, बहिष्कृत वर्गात दिसून येणारी विचार क्रांती ही अपूर्व आहे. आजपर्यंत लोकांना आपल्या दुरावस्थेचे कारण हे दुर्भाग्य आहे, असे वाटत होते. आता मात्र हा ईश्वरी लिलेचा पाक नसून इतरांच्या दुष्कृत्यांचा परिणाम असल्याची जाणीव होते, ही परिवर्तनाची नांदी होय. त्या काळातील हिंदू धर्माच्या व्यवहारानुसार जन्मसिद्ध योग्ययोग्यता व पवित्रापवित्रता या दोन तत्त्वान्वये हिंदू लोकांची विभागणी केली तर जन्माने श्रेष्ठ व पवित्र मानला जाणारा वर्ग म्हणजे ब्राह्मण होय. तर ज्याची जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रता ब्राह्मणापेक्षा कमी दर्जाची आहे, असा वर्ग म्हणजे ब्राह्मणेत्तर वर्ग होय. तसेच जन्मसिद्ध कनिष्ठ व अपवित्र अशांचा समूह म्हणजे बहिष्कृत वर्ग होय. अशा जन्मसिद्ध विषमतावादी वर्गीकरणाने गुणहीन ब्राह्मणांचे देखील कल्याण झाले आहे. ब्राह्मणेत्तरास मात्र जन्मसिद्ध अयोग्यतेचा भार सहन करावा लागल्यामुळे त्यांच्यातील आत्मभान व स्वाभिमान लोप पावत चालले होते. ज्यामुळे सामाजिक व आर्थिक दृष्ट्या ते दूर्बल झालेत. व्यापार, नौकरी व शेती यासारख्या धनसंचयाचे मार्ग बंद असल्याने त्यांच्या विकासाची नाकेबंदी झाली होती.



Chhatrapati Shahu Maharaj
26 June 1874-6 May 1922

हिष्कृत वर्गातील लोकांत नैसर्गिक गुण असल्याचे सर्व जण मान्य करत असले तरी सामाजिक परिस्थिती अनुकूल नसल्याने त्यांच्या प्रगतीला आळा बसत होता. म्हणून या समुदायाला राजकीय सामर्थ्य मिळविण्यासाठी जातवार प्रतिनिधित्व प्राप्त होण्याची आवश्यकता भिमराव आंबेडकरांनी व्यक्त केली होती. अन्यथा 'सत्यमेव जयते' हे तत्त्व पोकळ असल्याचे सिद्ध होईल. करिता सत्याचा जय होण्यासाठी आपण संघटीतपणे चळवळीच्या माध्यमातून संघर्ष करून लढा दिला पाहिजे.

दुसऱ्या दिवशी परिषदेत बोलताना शाहू महाराजांनी आंबेडकरांच्या भाषणाचा लाभ मिळावा म्हणून ते उपस्थित असल्याचे सांगून डॉ. आंबेडकर हे सर्व मागासवर्गीय जातीचा परामर्श घेतात, याबद्दल त्यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले. ब्रिटिश काळात बहिष्कृत वर्गातील लोकांनी दररोज हजेरी द्यावी लागत असे. ज्यामुळे या गरीब लोकांवर गांवकामगार व इतर अधिकारी फारच जुलूम व अन्याय करीत असत. कधी कधी तर हे अधिकारी, या लोकांना गैरहजेरीची भीती दाखवून फुकट काम करवून घेत असत. परिणामी त्यांच्या जवळचे नातेवाईक आजारी पडले तरी त्यांना भेटायला जाता येत नसत, एवढेच नव्हे! तर आजारी मुलांच्या आई वडिलांना जबरदस्तीने उचलून नेल्यामुळे परत आल्यावर त्यांना त्यांच्या मुलांचे मृत प्रेत पहायला मिळत होते, एवढी जुलमी सत्ता तेव्हा होती. तसेच हजेरीच्या लोकांपेक्षा बिनहजेरीच्या लोकांतच गुन्हेगारांची संख्या जास्त असल्याचे शाहू महाराजांनी नमूद केले आहे. ज्यामुळे बहिष्कृतांची अबरू व प्रतिष्ठा पणाला लागली होती. त्याचे बहिष्कृतांवर दूरगामी परिणाम झालेत. हे ध्यानात घेऊन शाहू महाराजांनी हजेरी प्रथा बंद केली. परिणामी गुन्ह्यांची संख्या कमी झाल्याचे व बलुतेदारांची भांडणे आणि मारामाऱ्या बंद झाल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. म्हणून त्या काळातील वतनदारास व बलुतेदारांस शाहू महाराजांनी वतनदारी व बलुतेदारी सोडून देण्याची विनंती केली होती. या विनंतीस मान देऊन करवीरच्या महारांनी वतनदारी सोडून देण्याचे कबूल केले होते. याचे अनुकरण सर्वत्र केले जावे अशी अपेक्षा महाराजांनी याप्रसंगी व्यक्त केली होती.

ा संदर्भात सातारा पोलीस सुप्रिटेंडंट मार्फत ब्रिटिश प्रशासनाने शाहू महाराजांना कळविले होते की, आजपर्यंतच्या हजेरीचे लोक निदान ब्रिटिश वगैरे पर हद्दीत जातील तेव्हा तरी त्यांना त्यांच्या संबंधाने आगाऊ वर्दी मिळावी. त्याला उत्तर देताना ४ जून १९१९ ला शाहू महाराजांनी कळविले होते की, ज्या अर्थी, मी हजेरी अजिबात माफ केली आहे; त्याअर्थी आपल्या इच्छेस मान देणे अशक्य झाले आहे. पण गुन्हेगार लोकांचे दाखले, मग ते स्पृश्य असोत की अस्पृश्य असोत, मी मोठ्या आनंदाने देत जाईन. जे खरोखरच चांगले पणाने वागणारे अस्पृश्य लोक आहेत, त्यांना जन्मभर गुन्हेगारांप्रमाणे वागविण्यास माझे अंत:करण मला सांगत नाही. याप्रमाणे हजेरी बंद केल्याबद्दल त्यांनी आपल्या भावना प्रशासनास कळविल्या होत्या.दरील सत्कार्याची नोंद घेऊन बाबुराव यादव यांनी पुस्तिका लिहिली होती. तसेच या कामी त्यांना सत्यशोधक समाज, आर्य समाज व अमेरिकन मिशन सुद्धा सहकार्य करीत होते. याबद्दल शाहू महाराजांनी त्यांचे आभार व्यक्त केले. या परिषदेत शाहू महाराजांनी खंत व्यक्त केली होती ती अशी की, महार, मांग, चांभार, ढोर हे खरोखर वैश्य जातीचे लोक असून विशेषतः महार लोक पूर्वी महारकी सूत काढून व्यापार करीत असत. तर मग त्यांना अस्पृश्य कोणी ठरविले असेल? असा वैश्यांचा धंदा सोडून दस्यू म्हणजे नोकर व नोकर म्हणजे अतिशूद्र, असे असताना अस्पृश्यांनी हा धंदा का स्विकारला असेल? असा प्रश्न त्यांनी विचारला होता. आपलपोटी मंडळी अयोग्य पुढारी नेमून देऊन अज्ञानी लोकांना फसवितात. अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना राजकारण करावयाचे आहे, त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशांत वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे. जो असे वागविल त्यांनीच देश कार्य केले, असे म्हणता येईल. करिता केवळ तोंडाने बडबड करणारे पुढारी नको आहेत तर कृतीने जातिभेद मोडून आम्हाला मनुष्याप्रमाणे वागवितील असे पाहिजेत. म्हणून आंबेडकरांना 'पंडित' ही पदवी बहाल करून आपण त्यांचे नेतृत्व स्विकारले पाहिजे. तेच आपला पुढील काळात उद्धार करणार आहेत. डॉ. आंबेडकर हे केवळ अस्पृश्यांचेच नव्हे! तर संपूर्ण भारताचे पुढारी होतील. अशा भावना व्यक्त करून डॉ. आंबेडकरांना रजपूतवाडिच्या कॅम्पवर भोजनाला येण्याचे निमंत्रण दिले होते. वतनी नौकरी हे दुसरे तिसरे काही नसून एक प्रकारची बेठबिगारीच होती. लाकडे फोडणे, जनावरांची प्रेते वाहने, गलिच्छ कामे करने इत्यादी. या वतनी नौकरीतून मुक्त केल्यास शूद्रतेचा व अस्पृश्यतेचा डाग कालांतराने नाहिसा होणार या आशेपोटी वतनी जमिनीचा रयतावा करण्यासाठी २७ जुलै १९२१ ला काही महार लोकांनी छत्रपती शाहू महाराजांकडे अर्ज सादर केला होता. तो अर्ज रजपूतवाडी कॅम्पमध्ये ५ आगष्ट १९२१ ला तात्काळ मंजूर करून तसा आदेश पारीत केला होता. या परिषदेत एकूण पंधरा ठराव मंजूर करण्यात आले होते. त्यातील ठराव क्रमांक दोन आणि ८ जानेवारी १९२० च्या भायखळ्याच्या सभेतील ठराव क्रमांक दोन प्रमाणे श्रीमंत महाराज शाहू छत्रपती सरकार इलाखा करवीर यांनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य सुरू केल्याबद्दल त्यांचा जन्म दिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा. असे त्या परिषदेचे मत होते. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या या आदेशाचे पालन करून भारतातील प्रत्येक नागरिकांने सामाजिक भान जपणा–या लोक राजा राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म दिवस सणाप्रमाणे साजरा करावा. करिता आपण सर्वांना या १५० व्या जयंती निमित्त कोटी कोटी सदिच्छा. तसेच शाहू महाराजांना विनम्र अभिवादन.

********


लेखक : बी. बी. मेश्राम, अभ्यासक, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल मेंबर आफ दि आल इंडिया नाग असोसिएशन (आईना) संपर्क : ९४२१६७८६२८

# मंदार कवाडे यांच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

मुंबई :- सम्यक कोकण कला संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मंदार कवाडे यांच्या भावनांचे मोहर व जीवन प्रवाह या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते तसेच बौद्धजन पंचायत समिती दिवेटप्पा शाखेचे अध्यक्ष श्रीपाल कवाडे यांच्या अध्यक्षतेखाली मंदार कवाडे यांच्या ६१ व्या जन्मदिवसाचे औचित्य साधून बुधवार, दि. २६ जून २०२४ रोजी सायंकाळी ४:३० ते ९:३० या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, गोकुळ पास्ता लेन, दादर (पूर्व), मुंबई-१३ येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बहुजन हितवर्धक कला संस्थेचे अध्यक्ष संतोष गमरे हे करणार असून सदर प्रसंगी राष्ट्रपाल सावंत, डॉ. संजय खैरे, श्रीकांत तळवटकर, नरेश मांडलेकर, संध्याताई गायकवाड, रमाकांत जाधव, अशोक कवाडे, विनायक जाधव, भगवान साळवी, प्रा. संतोष खरे, मारुती सकपाळ, विष्णू शिंदे, संजय मोरे, दीपक मांडलेकर, मनोहर देठे, नाथा जाधव, मुकुंद तांबे, विनोद धोत्रे, राजाभाऊ गमरे, संगम कासारे, नरेश शिंदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे तसेच सायंकाळी ४:३० ते ६:३० यावेळेत प्रबोधनात्मक गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व मान्यवर, रसिक प्रेक्षकांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी अशी विनंती सम्यक कोकण कला संस्था (रजि.) व महाराष्ट्र व दांडगुरी बौद्धजन सामाजिक विकास मंडळ (रजि.) यांच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात केली आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०- एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

लातूर / महेंद्र आल्टे : - दि. २५ जून २०२४ रोजी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर व तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२०: पदवी प्रथम वर्ष अभ्यासक्रम रचना व प्रवेश प्रक्रिया या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा व्होकेशनल सभागृह,महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर येथे पार पडली. या कार्यशाळेसाठी उपस्थित माध्यमिक,उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयातील उपस्थित शिक्षक व प्राध्यापकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- शालेय शिक्षण या विषयावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धाराशिव येथील अधिव्याख्याता डॉ. सुचित्रा जाधव यांनी मार्गदर्शन केले. पायाभूत स्तर व शालेय शिक्षण स्तर यामधील शैक्षणिक बदलाविषयीची माहिती माध्यमिक,उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयातील उपस्थित शिक्षक व प्राध्यापकांना दिली. या कार्यशाळेसाठी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.आदिनाथ सांगवे व सर्व पदाधिकारी तसेच स्वामी



रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील, सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर, लातूर विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ.गणपत मोरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## नागरिकांचे तक्रारी अर्ज महिनाभरात निकाली काढा निलंगा येथील जनता दरबारात आ अभिमन्यू पवार यांच्या सुचना..

निलंगा - मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न प्रशासनाच्या समोर जाणून घेत ते प्रश्न निकाली काढण्यासाठी आ अभिमन्यू पवार यांनी घेतलेल्या जनता दरबाराला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.दरम्यान (दि.२५) जून रोजी कासारसिरसी मंडळातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी निलंगा तहसील कार्यालयातील सभागृहात झालेल्या जनता दरबारात नागरिकांचे प्रश्न जाणून घेत याबाबत प्रशासनाने संबंधित तक्रारी अर्ज महिनाभरात निकाली काढण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या आहेत.याचबरोबर संबधित तक्रारदारांना त्यांनी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली यासंबंधी माहिती द्यावी आशा सूचनाही आ. पवारांनी यावेळी दिल्या.

आ अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून गेल्या चार वर्षांपासून मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सुरू केलेल्या जनता दरबारात अनेक नागरिकांचे प्रश्न सुटत असल्याने या जनता दरबारला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.या जनता दरबारात प्रशासनातील प्रत्येक विभागाचे अधिकारी एकाच व्यासपिठावर उपस्थित राहात असल्याने या जनता दरबारात आपले प्रश्न उपस्थित करून ते सोडवून घेण्याकडे नागरिकांचा कल राहीला आहे. मंगळवारी कासारसिरसी मंडळातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी घेण्यात आलेल्या जनता दरबारात मंडळनिहाय तोंडी व लेखी स्वरुपात तक्रारीची दखल घेण्यात आली.यावेळी लेखी तक्रारी प्राप्त झाल्या त्यानुसार तातडीने संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जास्तीत जास्त तक्रारींचा निपटारा या जनता दरबारात करण्यात आल्या तर उर्वरीत तक्रारी अर्ज संबधित विभागाने महिनाभरात निकाली काढण्याच्या सूचना आ अभिमन्यू पवार यांनी प्रशासनाला दिल्या.लेखी तक्रारी प्राप्त झाल्या. त्यानुसार तातडीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जास्तीत तक्रारींचा निपटारा या जनता दरबारात करण्यात आला.यावेळी तहसील कार्यालयात महा राजस्व अभियान अंतर्गत नागरिकांनी शासनाच्या विविध योजनेची माहिती देण्यासाठी उभारण्यात आलेल्या पुरवठा विभाग, सेतू सुविधा केंद्र, मतदार जागृती कक्ष, लेक लाडकी योजना, कृषी विभाग, महावितरण, बाल संगोपन योजना, सामाजिक वनीकरण, परिवहन महामंडळ, पशुसंवर्धन, पंचायत समिती, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना आदी कक्षाची पाहाणी केली. सज्ञ च्या ठिकाणी ग्रामसेव, तलाठी व कृषी सहाय्यक यांनी उपस्थित राहून जनतेचे प्रश्न सोडाव्यात तसेच नकाशावरील शेतरस्त्यांवरील अतिक्रमण काढण्याची जबाबदारी प्रशासनाची असल्याचे सांगून असे अतिक्रमण तातडीने काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, नायब तहसीलदार प्रविण आळंदकर, गटविकास अधिकारी सोपान अकेले, तालुका कृषी अधिकारी अनिल शेळके, बांधकाम विभागाचे उपअभियंता बोरफळे, पाणी पुरवठा उपअभियंता एस.एस.कुलकर्णी, पोलीस निरीक्षक बाळकृष्ण शेजाळ अदीसह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उमेद अंतर्गत महिला ग्रामसंघास ४० लाखांचा धनादेश..

या जनता दरबारात कासारसिरसी मंडळातील ६८ गावातील १३१ महिला ग्रामसंघास समुदाय गुंतवणूक निधी अंतर्गत ७४ लाख ६० हजार मंजूर असून प्राथमिक स्वरुपात कासार बालकुंदा प्रभागातील महिला ग्रामसंघा ४० लाख रुपयांचा धनादेश आ अभिमन्यू पवार व तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते वाटप करण्यात आला. यावेळी प्रभाग संघाच्या अध्यक्षा कल्पना ढविले यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

# जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची तब्बल ९० पदे रिक्त सांगा, शिकवायचे कुणी? : पदवीधरांच्या ४९ जागांना मुहूर्त केव्हा?

किनवट/शेख शौकत :- किनवट तालुक्यात २६४ जिल्हा परिषदेच्या शाळा असून ८६१ शिक्षकांची पदे मान्य असताना ७७१ शिक्षकांची पदे भरली आहेत. ९० पदे रिक्त आहेत. त्यात प्राथमिक पदवीधर शिक्षकांचा आकडा ४९ आहे. रिक्त पदांमुळे कार्यरत शिक्षकांवर अतिरिक्त भार पडत आहे. तर २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी व आठवी अशा ३५ शाळांत वर्ग वाढ देण्यात आली आहे. त्या-त्या शाळेत आहे त्या शिक्षकांवर भागवावे लागणार आहे. किनवट या आदिवासी तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २६४ शाळा असून स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषदेच्या शाळेत १५ हजार ९७४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना विद्यार्जन करण्यासाठी ८६१ शिक्षकांची पदे मंजूर आहेत. ७७१ शिक्षकांची पदे भरण्यात आली आहेत. पहिल्या शैक्षणिक सत्राला १५ जूनपासून प्रारंभ झाला आहे. शाळा सुरू होऊन चार दिवसांचा कालावधी लोटत आला तरी ९० शिक्षकांची पदे रिक्तच आहेत. या रिक्त पदांमध्ये सायन्सचे १३, भाषा ११, मुख्याध्यापक १६ व अन्य एक असे ४९ प्राथमिक पदवीधर शिक्षकांची, तर ४१ प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची तब्बल ९० पदे रिक्त सांगा, शिकवायचे कुणी? : पदवीधरांच्या ४९ जागांना मुहूर्त केव्हा? काही जि.प. हायस्कूलमध्ये पोस्ट विज्ञान विषयाची आहे, तर तिथे गणिताचा शिक्षक भरण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा




परिषदेच्या शिक्षण विभागात ताळमेळ नसावा का? तालुक्यातील जि.प. प्रा. शाळेत शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे आहे त्या शिक्षकांवर भागवण्याची वेळ सध्यातरी शिक्षण विभागावर आली आहे. किनवट तालुक्यातील जि.प.च्या शिक्षकांची रिक्त पदे वेळीच भरण्याची मागणी पालकवर्गातून होत आहे. आज जरी इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीची वर्गवाढ आली असली, तरी 'यूडायस'वर विद्यार्थी संख्या चढल्यावरच मान्यता दिली जाईल, असे गटशिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांनी सांगितले. तर शिक्षकांची ९० पदे रिक्त असल्याच्या वृत्ताला बने यांनी दुजोरा दिला आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ८ माध्यमिक शाळा आहेत. येथे विषयनिहाय पुरेसे शिक्षक नसल्याने विद्यार्थी संख्या रोडावली आहे. पालकांचा कल इंग्रजी व खाजगी शाळांकडे आहे. अशा स्थितीत रिक्त पदांमुळे आहे त्या शिक्षकांवर त्यांच्या विषयाव्यतिरिक्त विषयाच्या जादा तासिकांचा भार पडत आहे. आदिवासी तालुक्यातील गोरगरीब, मागास, श्रमिकांची मुले शिकणाऱ्या पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील हा रिक्त पदांचा अनुशेष भरून काढायला जिल्हा परिषद प्रशासनाला कधी उसंत मिळेल याचीच पालक चातकासारखी वाट पाहत आहेत. प्रशासकराज' असल्याने पाठपुरावा होईना

यावर्षी किनवट तालुक्यातील १७ जि.प. प्राथमिक शाळेत इयत्ता पाचवा वर्ग, तर १८ उच्च प्राथमिक शाळेत इयत्ता आठव्या वर्गाला वर्गवाढीची मान्यता मिळाली आहे, अशा वर्गवाढ झालेल्या शाळेत आहे त्या कार्यरत शिक्षकां- वरच भागविले जाणार आहे. जि.प.चे लोकप्रतिनिधी असताना कशी तरी ओरड व्हायची; पण आता जिल्हा परिषदेवर प्रशासक राज असल्याने पाठपुरावा करणार कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.


# किनवट ते हिमायतनगर या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने वृक्ष लागवड करा अन्यथा तीव्र आंदोलन...

किनवट/शेख शौकत :-पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासन स्तरावर झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देऊन वृक्ष लागवडीसाठी शासन स्तरावर करोडो रुपये खर्च केले जात आहेत तर दुसरीकडे हिमायतनगर ते कोठारी राष्ट्रीय महामार्गाचे काम करण्यासाठी रोड लगत असलेले लाखो वृक्षाची तोड करून राष्ट्रीय महामार्ग बनवला जात आहेत मात्र जिथे जिथे राष्ट्रीय महामार्गाचे काम झाले आहे तिथे राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने वृक्ष लागवड करण्याचे बंधनकारक असताना देखील सबंधित गुत्तेदारांनी कुठेच वृक्ष लागवड केली नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने संबंधित गुत्तेदारांनी हिमायतनगर ते कोठारी या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने या पावसाळ्यात तरी वृक्ष लागवड करावी अन्यथा संबंधित गुत्तेदाराच्या विरोधात महाविकास आघाडीच्या पदाधिकारी वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे. किनवट ते हिमायतनगर या राज्य मार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर होऊन राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात करण्यापूर्वी रोड लगत असलेल्या जिवंत झाडांचे मोजमाप करून सर्वे करण्यात आला आणि अनेक वर्षापासून रोड लगत असलेल्या मोठमोठ्या लाख- जिवंत झाडांची कटर मशीन च्या साह्याने तोड करून राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात केली आहे. या राष्ट्रीय महामार्गाचे काम करत असताना किनवट हिमायतनगर तालुक्यातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे. अनेक वेळा तालुक्याच्या ठिकाणी या जिल्ह्याच्या ठिकाणी



कामानिमित्त जाण्यासाठी नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागला तर अनेक ठिकाणी जीवित हानी झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. या रोडचे काम पूर्ण करण्यासाठी अनेक वेळा सर्व पक्षाच्या वतीने आंदोलने ही करण्यात आली होती तर या रोडच्या कामाची गती वाढवण्यासाठी माननीय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना अनेक वेळा भेटी घेऊन हे काम पूर्ण करण्यासाठी त्यांना गुत्तेदार तरी बदला अशी मागणी ही करण्यात आली होती. हा राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित गुत्तेदाराकडुन काम होताना या गुत्तेदाराकडून तालुक्यातील नागरिकांना हाल आपेष्टा सहन कराव्या लागल्या या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात होऊन आज जवळपास पाच वर्ष पूर्ण झाले आहेत. किनवट कोठारी ते हिमायतनगर राष्ट्रीय महामार्गाचे काम आज जवळप- इस परिपूर्ण होत आले आहेत उर्वरित फुलांचे काम सुरू आहे या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गेली पाच वर्षे पूर्ण झाली आहेत मात्र १६१ राष्ट्रीय महामार्गाच्या रोड लगत दोन्ही बाजूने आतापर्यंत एकाही वृक्षाचे लागवड केल्याचे दिसून येत नाही मात्र रोड लगत ची लाखो झाडे तोडून पर्यावरणाचा व्हास बिघडवणाऱ्या संबंधित गुत्तेदारांनी या पावसाळ्यात तरी वृक्ष रोपवनाची लागवड करून जोपासना करण्यासाठी लागणारे साहित्यासह वृक्ष लागवड करावी अन्यथा संबंधित गुत्तेदाराच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.


छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा







शुभेच्छुक.
सागर रामभाऊ तायडे,भांडुप मुंबई


# धाराशिव जिल्ह्यातील वर्ग दोनमधील जमीनी वर्ग १ मध्ये करा राष्टवादीचे संजय पाटील दुधगावकर यांची महसूल मंत्र्यांकडे मागणी

धाराशिव : प्रतिनिधी धाराशिव जिल्ह्यातील वर्ग २ मधील जमीनी वर्ग १ मध्ये करण्याचा निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी राष्टलवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे मंगळवारी (दि.२५) निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दिलेल्या निवेदनात श्री. दुधगावकर यांनी म्हंटले आहे की, धाराशिव जिल्ह्यातील सुमारे साडेबारा हजार एकर इनामी, मदत्मास, खिदमत मास सीलिंग जमिनी व महार वतन जमीन वर्ग १ मधून वर्ग २ मध्ये घेतल्यामुळे शेतकरी व प्लॉट धारकांवर मोठा अन्याय झालेला आहे. महाराष्ट्रात केवळ धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी व प्लॉटधारक हवालदिल झाले आहेत. याप्रकरणामध्ये प्रशासन व सरकार



वेळकाढूपणा करत आहे. या निर्णयामुळे धाराशिव शहर व जिल्ह्यातील शेतकरी, प्लॉटधारक यांचे व्यवहार ठप्प झाले असून शेतकजयांसह प्लॉटधारकांना कर्ज प्रकरणे करताना अडचणी निर्माण होत आहेत. शासनाने विदर्भ आणि पश्चित महाराष्टलात असाच निर्णय घेतला होता. तो शासनाने रद्दबादल केला, परंतू धाराशिव जिल्ह्याबाबत शासन ठोस भूमिका घेताना दिसत नाही. यामुळे अनेकांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. त्यासाठी आपण याप्रकरणी स्वत: लक्ष घालून वर्ग दोनमध्ये गेलेल्या जमीनी व प्लॉट वर्ग एकमध्ये करण्यासाठी तातडीने निर्णय घेवून अंमलबजावणी करावी, अन्यथा येत्या चार दिवसात शासनाच्या विरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.


PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE